# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 16 February 2025

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. काल रात्री झालेल्या या चेंगराचेंगरीत अनेक लोकांचा मृत्यू झाल्यानं अतीव दुःख झाल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं असून जखमींना लवकर बरे होण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. दुर्घटनेनंतर आता परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमाद्वारे दिली आहे . गर्दी कमी करण्यासाठी प्रयागराजमधील महाकुंभासाठी तात्काळ चार विशेष रेल्वे गाड्या पाठवण्यात आल्या आहेत.

आपला संपूर्ण चमू दुर्घटनाग्रस्तांची मदत करण्यासाठी काम करत आहे असं ते म्हणाले, तर सर्वांना शक्य ती सर्व मदत करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले आहेत.

****

मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच आधुनिक शिक्षण देण्यासाठी अनुदान देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी पात्र मदरशांकडून येत्या फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

सच्चर समितीच्या अहवालाच्या आधारे केंद्रशासनानं घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगानं, अल्पसंख्याक समुदायास केंद्रशासनाच्या इतर विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देखील देण्यात येतो. पात्र मदरशांच्या निवासस्थानात अखंडीत विजेची सुविधा तसंच पेयजलाची व्यवस्था करणं या दोन पायाभूत सोयी सुविधा पात्र मदरशांनी सुधारीत प्रस्ताव पाठवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

छत्तीसगडमधील नागरी संस्थांच्या निवडणुकीत, भारतीय जनता पक्षानं १७३ नागरी संस्थांपैकी १२६ जागा जिंकल्या तर काँग्रेसनं ३९ जागा जिंकल्या आहेत. राज्यातील दहाही महानगरपालिकांमध्ये महापौरपदासाठी भाजपचे उमेदवार निवडून आले आहेत. एकूण ४९ नगरपालिकांपैकी ३५ नगरपालिकांमध्ये भाजपचे उमेदवार अध्यक्षपदासाठी निवडून आले आहेत.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अनुषंगानं सर्व विभागांनी गतिमान प्रशासनासाठी ई-कार्यालय प्रणालीचा अवलंब करावा, असे निर्देश जिल्ह्याचे पालक सचिव तथा राज्याचे महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिले आहेत. जळगाव इथं सर्व विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत काल ते बोलत होते.

"आता इथून पुढं कागदी फाईलऐवजी ई-फाईलच्या माध्यमातून कामकाज होणार आहे. त्यामुळं प्रत्येक विभागानं आपलं पूर्ण ई-कार्यालय कार्यान्वित करून नागरिकांना तत्काळ ई-सेवा उपलब्ध करून द्यावी, कृषी आणि पणन विभागानं शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन कार्य करावं. कृषी विभागाकडून बांधलेले गोदाम पूर्ण क्षमतेने सुरू राहावेत, यासाठी प्रयत्न करावे, असं राजेशकुमार यांनी सांगितलं.

****

नाशिक शहरात असमतोल पाणीवाटप होत असून सध्या पाणी गळतीचं प्रमाण ४० टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळं येत्या तीन महिन्यांत शहराच्या प्रत्येक भागात वॉटर मीटर बसवून शासनाला अहवाल सादर करावा, असे आदेश जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी नाशिक महापालिकेला काल दिले. नाशिक इथं यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार देवयानी फरांदे यांच्यासह विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, मनपा आयुक्त मनीषा खत्री आदी उपस्थित होते.

राज्यातल्या सर्वच महापालिका, नगरपालिकांसाठी आढावा बैठक घेण्याचं काम सुरू आहे. बिगर सिंचनाचं आरक्षण वाढत चाललं आहे. त्यामुळं काळजी घेतली पाहिजे असं ते म्हणाले. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी स्वच्छ ठेवणं, प्रदूषणमुक्त करणं गरजेचं आहे. त्यात प्रत्येकाचाच सहभाग महत्त्वाचा असल्याचं विखे पाटील यांनी यावेळी सांगितलं.

****

भाजपच्या सक्रिय सदस्य नोंदणीचं उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत तिकिट वाटपाबाबतीत प्राध्यान्य दिलं जाईल असं भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना सूचित केलं आहे. भाजपच्या उत्तर महाराष्ट्राच्या विभागीय कार्यशाळेत काल जळगांव इथं ते बोलत होते.

****

सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर सोलापूर शहराजवळ काल सायंकाळी झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले आहेत. सोलापूरकडून हैद्राबादकडे जाणाऱ्या एका वाहनानं, रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकींना धडक दिल्यामुळे हा अपघात झाला.

दुचाकीस्वारांना धडक दिल्यानंतर दुभाजक ओलांडून वाहन विरुद्ध दिशेला असलेल्या मोटार गॅरेजवर आदळलं त्याचवेळी रस्त्यावरुन येणाऱ्या अनेक वाहनांनाही धडक बसली. या अपघातात गंभीर जखमी असलेल्या चौघांवर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

****